वर्ष ४
अंक १
जानेवारी-फेब्रुवारी २०२५

# द मिठीबाई क्रोनिकल्स

## 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम विशेषांक २०२५



'द मिठीबाई क्रोनिकल्स' हे मिठीबाई महाविद्यालयाच्या जितेंद्र ग्रंथालयाचे द्वैमासिक वृत्तपत्र आहे. या वृत्तपत्राचा मुख्य उद्देश ग्रंथालयाच्या वाचकांना ग्रंथालयात दाखल झालेल्या नवीन पुस्तकांची आणि ग्रंथालयातील इतर संसाधनांची माहिती प्रदान करणे हा आहे. याव्यतिरिक्त, हे वृत्तपत्र ग्रंथालय आणि त्याच्या वाचकांमधील संवाद माध्यम म्हणून कार्य करते. मला खात्री आहे की 'द मिठीबाई क्रोनिकल्स' हे मिठीबाई महाविद्यालयातील वाचन उत्सुक, चैतन्यशील मनांची वाचन भूक नक्कीच भागवेल आणि हे वृत्तपत्र वाचून त्यांना आनंदच होईल.

सौ. अर्चना गराटे
ग्रंथपाल

**दिसामाजी काहीतरी ते लिहावे । प्रसंगी अखंडित वाचीत जावे ॥**

रामदास स्वामी

## वृत्तपत्र: एक दृष्टिक्षेप

- संपादकीय
- पसायदान
- वाचनाचे फायदे - चित्राकृती
- वाचन पूरक कार्यक्रम
- स्पर्धा
- ग्रंथ परीक्षणे
- नव्याने दाखल झालेल्या ग्रंथांची मुखपृष्ठे



**वाचू आनंदे**
**मिळवू परमानंदे**

द्वैमासिक वृत्तपत्र



**या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता।**

**या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना॥**

**या ब्रह्माच्युत शंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता।**

**सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा॥1॥**

अर्थात्

देवी सरस्वती जी अज्ञानाचा समूळ नाश करते ती आमचे रक्षण करो. ती देवी जी कुन्दाच्या फुलाप्रमाणे सतेज आहे. बर्फाप्रमाणे आणि दवबिंदूप्रमाणे दिसणाऱ्या मोत्यांच्या हाराप्रमाणे गौर शुभ्र वस्त्र धारण केलेली श्वेत कमळावर आसनस्थ आहे, तिने वीणा धारण केली आहे, आणि ब्रह्मा विष्णू व शंकरासारखे श्रेष्ठ देव ही तिला वंदन करतात, ती देवी सरस्वती आमचे रक्षण करो व आमच्यातील अहम समूळ नाश करो. (ही प्रार्थना).

# संपादकीय

## मिठीबाई महाविद्यालयातील 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या २० डिसेंबर २०२४ च्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याकरिता तसेच त्यांची वाचन कौशल्ये विकसित करण्यासाठी अनेक उपक्रम महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करण्यास सुचविले गेले होते. त्याअनुषंगाने श्री विलेपार्ले केळवणी मंडळाच्या मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी अनेक वाचन पूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची वाचन सवय वृद्धिंगत व्हावी व त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने उत्तमोत्तम कार्यक्रमांची आखणी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. कृतिका देसाई यांनी ग्रंथपाल सौ. अर्चना गराटे व सर्व विभाग प्रमुख यांसमवेत बैठक घेऊन केली. प्राचार्यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरिता दिनांक ०४ जानेवारी २०२५ ते १६ जानेवारी २०२५ दरम्यान अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

उपक्रमाची सुरुवात ग्रंथ दिंडीने केली गेली. विद्यार्थ्यांनी, ग्रंथपाल, ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी व शिक्षकांनी वाद्ये व घोषणांच्या गजरात दिमाखदारपणे ग्रंथालयातील ग्रंथांची दिंडी काढून महाविद्यालय परिसरात वाचनवृद्धी साठी जल्लोष केला. याव्यतिरिक्त ग्रंथालयातील पुस्तकांचे प्रदर्शन भरविले गेले. 'वाचन' व 'ग्रंथ' या विषयांना महत्व देऊन भित्तीपत्रक (पोस्टर मेकिंग) स्पर्धा आयोजित केली गेली. ग्रंथातल्या पात्रांप्रमाणे वेशभूषा करण्याची स्पर्धा देखील आयोजित केली गेली.

वाचनासोबतच विद्यार्थ्यांना लिहिते करण्यासाठी, म्हणजेच त्यांची लेखन कौशल्ये विकसित व्हावीत या उद्देशाने 'ग्रंथ व इ-ग्रंथ' तसेच 'अभ्यासाकरिता वाचन आणि अवांतर वाचन' या विषयांवर निबंध लेखन स्पर्धा आयोजित केली गेली. याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी ग्रंथांवर आधारित प्रश्नमंजुषा, सामूहिक वाचन, अभिवाचन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

लेखकांशी संवाद उपक्रमाअंतर्गत अनेक मान्यवर लेखकांना महाविद्यालयात आमंत्रित करण्यात आले होते. त्यात शास्त्रज्ञ व लेखक पद्मश्री प्रा. रामकृष्ण होसूर, शास्त्रज्ञ व लेखक डॉ. बाळ फोंडके, लेखक श्री. आनंद नीलकंठन, लेखक डॉ. अजय पालेकर, लेखिका डॉ. ज्योती व्होरा, लेखिका रुपांगी शर्मा, लेखक श्री. असीम चाफळकर, लेखक डॉ. दशरथ पटेल यांचा समावेश होता. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी याकरिता आपल्या संवादातून वाचनाचे महत्व पटवून दिले तसेच अनेक उत्तमोत्तम ग्रंथांची ओळख करून दिली.

भित्तीपत्रक स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा व निबंध लेखन स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे याकरिता प्रत्येक स्पर्धेतून प्रथम तीन पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी सर्व कार्यक्रमांत अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. एकूणातच, मिठीबाई महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम विद्यार्थ्यांच्या सहभागात यशस्वीरीत्या पार पडला.

**सौ. अर्चना गराटे**
**ग्रंथपाल**

# पसायदानाचा मराठी अर्थ

आता विश्वात्मक देवाने, या माझ्या वाग्यज्ञाने संतुष्ट व्हावे आणि मला हे पसायदान ( प्रसाद ) द्यावे. ॥ १ ॥

दुष्टांचे दुष्टपण नाहीसे होवो, त्यांना सत्कर्मे करण्या मध्ये स्वारस्य वाढो.
सर्व प्राणीमात्रांमध्ये मित्रत्वाची भावना निर्माण होवो. ॥ २ ॥

पापी माणसाचा अज्ञानरुपी अंधार नाहीसा होवो, विश्वात स्वधर्मरूपी सूर्याचा उदय होवो.
प्राणीमात्रांच्या मंगल इच्छा पूर्ण होवोत. ॥ ३ ॥

सर्व प्रकारच्या मंगलांचा वर्षाव करणारे ईश्वरनिष्ठ संत पृथ्वीवर अवतरत जावोत आणि
प्राणिमात्रांना भेटत जावोत. ॥ ४ ॥

जे (संत) कल्पतरूंची चालती बोलती उद्याने आहेत, चेतनारूपी चिंतामणी रत्नांची जणू गावेच आहेत,
अमृताचे बोलणारे समुद्रच आहेत, ॥ ५ ॥

जे कोणताही डाग नसलेले निर्मळ चंद्रच आहेत, तापहीन सूर्यच आहेत असे संतसज्जन
सर्व प्राणिमात्रांचे मित्र होवोत. ॥ ६ ॥

तिन्ही लोकांनी सर्व सुखांनी परिपूर्ण होऊन अखंडितपणे विश्वाच्या आदिपुरुषाची सेवा करावी. ॥ ७ ॥

हा ग्रंथ ज्यांचे जीवन आहे, त्यांनी या जगातील दृष्य आणि अदृष्य भोगांवर विजयी व्हावे. ॥८ ॥

यावर विश्वेश्वर गूरु श्री निवृत्तीनाथ म्हणाले की हा प्रसाद तुला लाभेल. या वराने ज्ञानदेव सुखी झाले. ॥ ९ ॥

wikipedia.org

# संत ज्ञानेश्वर

संत ज्ञानेश्वर (इ. स. १२७५ - १२९६) हे महाराष्ट्राच्या महान संतांपैकी एक होते. ते महाराष्ट्रातील एक थोर योगी, तत्त्वज्ञानी, संतकवी. भागवत तथा वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञ प्रवर्तक होते. त्यांनी आध्यात्मिक समतेवर आधारलेल्या वारकरी संप्रदायाची सुरुवात केली. अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जाणारा ज्ञानमार्ग त्यांनी सर्वसामान्यांना दाखवला. वारकरी संप्रदायाला जन्म देणारे ज्ञानदेव सर्व संतांची माउली होत. आजही ज्ञानेश्वरांची पालखी खांद्यावर घेऊन संत मोठ्या भक्तिभावाने ज्ञानेश्वर माउलीच्या नावाचा गजर करत नामसंकीर्तनात दंग होऊन पंढपूरला जातात. संत ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी), अमृतानुभव, चांगदेवपासष्टी व हरिपाठाचे अभंग अशा विश्वकल्याण करणाऱ्या साहित्याची (काव्याची) निर्मिती केली.

संत ज्ञानेश्वरांनी वयाच्या सोळाव्या वर्षी संस्कृत मधील भगवद्गीतेचा अत्यंत रसाळ भाषेत सामान्य जनांना समजेल असा प्राकृतात 'भावार्थदीपिका' म्हणजेच 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला. ज्ञानेश्वरीच्या शेवटी ज्ञानेश्वरांनी लिहिलेले पसायदान समावेष्टित आहे. पसायदान हे त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी केलेली प्रार्थना आहे. भागवत धर्म हा सर्वांसाठी समान आहे, सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहेत, वारकरी संप्रदायाचा जो आचारधर्म आहे, तो कोणीही आचरणात आणून ईश्वरप्राप्ती करू शकतो, अशा साध्या सोप्या शब्दांत त्यांनी रंजल्या गांजल्या लोकांना भक्तीचा मार्ग दाखवला. ज्ञानेश्वरांनी आळंदी येथे संजीवन समाधी घेतली.



**संत ज्ञानेश्वर महाराज**

# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥

जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें जडो। मैत्र जीवांचें ॥ २ ॥

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो । जो जें वांच्छील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥

वर्षत सकळमंगळीं । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळीं । भेटतु या भूतां ॥ ४ ॥

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचें गाव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥ ७ ॥

**आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ॥ ८ ॥**

येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥ ९ ॥

**संत ज्ञानेश्वर महाराज**

# वाचनाचे फायदे


भाषा समृद्धी
मानसिक विकास
शब्दसंपदेत वाढ
आत्मविश्वासात वृद्धी
ज्ञानाचा विस्तार
मनोरंजन
एकाग्रता
तणावमुक्ती
कलात्मक विकास
स्मरणशक्तीचा विकास

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | उपक्रमाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | ग्रंथदिंडी | ८ |
| २. | पुस्तक प्रदर्शन | ९ |
| ३. | सामूहिक पुस्तक वाचन | १० |
| ४. | अभिवाचन | ११ |
| ५. | **वाचन कार्यशाळा-** | |
| | भारतीय भाषा विभाग- मराठी | १३ |
| | भारतीय भाषा विभाग- हिंदी | १३ |
| | भारतीय भाषा विभाग- गुजराती | १४ |
| | इंग्रजी भाषा विभाग | १४ |
| ६. | **लेखकांशी संवाद -** | |
| | शास्त्रज्ञ व लेखक पद्मश्री प्रा. रामकृष्ण व्ही. होसुर | १५ |
| | शास्त्रज्ञ व लेखक डॉ. बाळ फोंडके | १६ |
| | लेखक श्री आनंद नीलकंठन | १७ |
| | लेखक डॉ. अजय पालेकर | १८ |
| | लेखिका डॉ. ज्योती व्होरा | १९ |
| | लेखिका रुपांगी शर्मा | २० |
| | लेखक डॉ. दशरथ पटेल | २१ |
| | लेखक श्री. असीम चाफळकर | २२ |
| ७. | **स्पर्धा** | |
| | निबंध लेखन स्पर्धा | २३ |
| | भित्तीपत्रक (Poster Making) स्पर्धा | २४- २७ |
| | पुस्तकातील पात्रांप्रमाणे वेशभूषा स्पर्धा | २८ |
| | प्रश्नमंजुषा (Quiz) स्पर्धा | २९ |
| ८. | ग्रंथ परीक्षण | ३०- ३९ |
| ९. | नव्याने दाखल झालेल्या ग्रंथांची मुखपृष्ठे | ४०- ४७ |

# ग्रंथदिंडी

मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयात ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांची सुरुवात दिनांक ४ जानेवारी २०२५ रोजी आयोजित केलेल्या ग्रंथदिंडीने झाली. 'वाचलं तर वाचाल', 'वाचन बिना जीवन अधुरा है', या घोषणा देत; तर ‘ग्रंथसंपदे तुझा महिमा कसा, गगनाला गवसणी घालेल असा’ अशा टाळ व लेझीम यांच्या नादात ग्रंथदिंडी महाविद्यालयीन परिसरात काढण्यात आली.

या ग्रंथदिंडीत महाविद्यालयाच्या प्राचार्या, उप-प्राचार्या, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उस्फूर्त सहभाग घेतला. उपस्थित समुदायाने विभिन्न विषयावरील ग्रंथ हाती घेऊन वाचन महत्तेचा जयघोष करीत ग्रंथदिंडीचे संचालन केले. सुमारे दीडशे उपस्थितांच्या उस्फूर्त सहभागात वाचनाच्या महत्त्वाचा आणि उद्देशाचा प्रचार-प्रसार करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथदिंडीबद्दल कुतूहल निर्माण झाले , तसेच पुस्तकांबद्दल आस्था व प्रेम वाटू लागले यामुळेच नंतर करण्यात आलेल्या ग्रंथप्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. ग्रंथप्रदर्शनात त्यांनी आवडत्या पुस्तकांचा शोध घेतला व वाचनालयात जाण्यासाठी मुले उद्युक्त झाली.

**ग्रंथदिंडी कार्यक्रमाची क्षणचित्रे**







# पुस्तक प्रदर्शन

दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. अर्चना गराटे यांनी ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या मदतीने महाविद्यालय परिसरात मराठी, इंग्रजी, हिंदी आणि गुजराती भाषांमधील संदर्भग्रंथ, चरित्रग्रंथ, प्रेरणादायीग्रंथ, स्व-मदत आणि पुरस्कार विजेते ग्रंथ अशा विविध विषयांवरील उत्तमोत्तम पुस्तकांचे प्रदर्शन भरविले.

या कार्यक्रमात एक हजारांहून अधिक ग्रंथ प्रदर्शित करण्यात आले. महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी वर्गाने प्रदर्शनाला भेट दिली. ग्रंथालयातून ग्रंथ-देवघेव सोपस्कार करून प्रदर्शनातील ग्रंथ वाचकांना घरी वाचावयास देण्यात आले. सदर उपक्रमास वाचकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.

### ग्रंथ प्रदर्शनाची क्षणचित्रे





# सामूहिक पुस्तक वाचन

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' ह्या उपक्रमाअंतर्गत मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयात दिनांक ०४.०१.२०२५ ते १६.०१.२०२५ दरम्यान विद्यार्थ्यांसाठी सामूहिक पुस्तक वाचनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यात महाविद्यालयातील अर्थशास्त्र, इंग्रजी, भारतीय भाषा (मराठी), तत्त्वज्ञान, जैवरसायन शास्त्र, वनस्पती शास्त्र, संगणक विज्ञान, गणित, प्राणिशास्त्र व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) या विभागांतून विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद देत सहभाग नोंदविला.

यामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीची पुस्तके वाचली. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी व त्यांनी अधिकाधिक पुस्तके वाचावीत हे या उपक्रमाचे उद्दिष्ट होते.

स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची विभाग निहाय माहिती पुढीलप्रमाणे:

| अ. क्र. | विभाग | सहभागी विद्यार्थी संख्या | अ. क्र. | विभाग | सहभागी विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्थशास्त्र | २२ | ७ | वनस्पतीशास्त्र | २९ |
| २ | इंग्रजी | ३४ | ८ | संगणक विज्ञान | २५ |
| ३ | मराठी भाषा | १२ | ९ | गणित | १७ |
| ४ | तत्त्वज्ञान | ९ | १० | प्राणिशास्त्र | १४ |
| ५ | जैवरसायनशास्त्र | १२ | ११ | राष्ट्रीय सेवा योजना (NSS) | ४७ |
| ६ | मानसशास्त्र | २७५ | | | |
| | | **एकूण** | | | **४९६** |

## कार्यक्रमाची क्षणचित्रे






# पुस्तक अभिवाचन


मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या भारतीय भाषा विभाग (मराठी), रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, अर्थशास्त्र, इंग्रजी, जैवरसायन शास्त्र, वनस्पती शास्त्र, संगणक विज्ञान, गणित, प्राणिशास्त्र या विभागांतर्फे विभागीय स्तरावर पुस्तक वाचन कार्यक्रमांची आखणी करण्यात आली होती. यामध्ये विद्यार्थ्यांनी पुस्तकांचे सामूहिकरीत्या वाचन केले. विद्यार्थ्यांना त्यांची वाचन शैली, शब्दसंग्रह व आकलन शक्ती विकसित करता यावी हा या उपक्रमामागील उद्देश होता.

स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची विभाग निहाय माहिती पुढीलप्रमाणे:

| अ. क्र. | विभाग | सहभागी विद्यार्थी संख्या | अ. क्र. | विभाग | सहभागी विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्थशास्त्र | १७ | ६ | रसायन शास्त्र | १४० |
| २ | इंग्रजी | १८ | ७ | संगणक विज्ञान | २५ |
| ३ | मराठी भाषा | १२ | ८ | गणित | १७ |
| ४ | जैवरसायनशास्त्र | १२ | ९ | प्राणिशास्त्र | ५० |
| ५ | वनस्पतीशास्त्र | २६ | १० | राष्ट्रीय सेवा योजना (NSS) | २४ |
| एकूण | | | | | ३८१ |

**ग्रंथदिंडी कार्यक्रमाची क्षणचित्रे**






# वाचन कार्यशाळा अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

## भारतीय भाषा विभाग- मराठी

## भारतीय भाषा विभाग- हिंदी

## भारतीय भाषा विभाग- गुजराती

## इंग्रजी भाषा विभाग



# वाचन कौशल्य कार्यशाळा अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

### अहवाल: वाचन कौशल्य कार्यशाळा
### भारतीय भाषा विभाग- मराठी
### दिनांक: ११/०१/२०२५


वाचन संकल्प महाराष्ट्राचा (१ जानेवारी ते १५ जानेवारी) अंतर्गत मिठीबाई महाविद्यालयात भारतीय भाषा विभाग-मराठी द्वारे दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी 'वाचन कौशल्य विकसन कार्यशाळा' आयोजित केली होती. कार्यशाळेत वाचन कौशल्य विकसित करण्याच्या पाय-या, मूल्ये, दैनंदिन जीवनात वाचनाचे महत्त्व, उपयोगी साधने, वाचनाचा सराव, पुस्तकांची निवड, स्पष्टोच्चार, शब्दसंग्रह याविषयी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापिका श्रीमती प्राची काटपाताळ यांनी मार्गदर्शन केले. डॉ. विठ्ठल कामत, सुरेश भट, वि.स. खांडेकर, वसंत आबाजी डहाके, डॉ. जितेन्द्र पेंढारकर, कवी ग्रेस, यशवंत मनोहर, चि. त्र्यं खानोलकर या लेखकांच्या पुस्तकातील मजकूर, कविता विद्यार्थ्यांनी वाचल्या. याकरिता ग्रंथालयातून विविध पुस्तके विद्यार्थ्यांनी आणली. कार्यक्रम उत्साहात पार पडला.

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

### अहवाल: वाचन कौशल्य कार्यशाळा
### भारतीय भाषा विभाग- हिंदी
### दिनांक: ७/०१/२०२५

श्री विले पार्ले केळवाणी मंडळाद्वारे संचालित मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या भारतीय भाषा-हिंदी विभागाने ७ जानेवारी २०२५ रोजी पदवीपूर्व स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी 'वाचन कौशल्य कार्यशाळा' आयोजित केली. यामध्ये, महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक श्री. राकेश पानसे यांनी विद्यार्थ्यांना हिंदी गद्य आणि कविता यांचे योग्यरित्या, व्याकरणदृष्ट्या अचूक, अर्थाशी सुसंगत आणि प्रभावीपणे कसे वाचन करायचे याबद्दल मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेत वाचतांना करावयाच्या नियमांचे पालन, अर्थाच्या मर्यादा, आणि वाचनातून मिळणारे फायदे यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले. उपस्थित ६४ विद्यार्थ्यांना या कार्यशाळेचा फायदा झाला. हिंदी भाषेशी संबंधित वाचन उपक्रमांचे हे आयोजन विद्यार्थ्यांसाठी निश्चितच फायदेशीर ठरले. याशिवाय, इतर भाषांमधील ग्रंथ वाचण्याचे महत्त्व देखील अधोरेखित करण्यात आले.

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★



# वाचन कार्यशाळा अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

### अहवाल:  वाचन कौशल्य कार्यशाळा
### भारतीय भाषा विभाग- गुजराती
### दिनांक: ७/०१/२०२५

‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ अंतर्गत भारतीय भाषा- गुजराती विभागात मंगळवार, ०७/०१/२०२५ रोजी 'वाचन कौशल्य कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. गुजराती विषयातील ‘प्रमुख’ आणि ‘वैकल्पिक’ विषयांच्या २८ विद्यार्थ्यांनी यांत उत्साहाने सहभाग घेतला. महाविद्यालयातील गुजराती भाषा विभाग प्रमुख डॉ. दशरथ पटेल यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचन वृद्धी होण्याकरिता त्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले तसेच चांगली पुस्तके वाचण्याचे अनेक फायदे विस्तृतपणे सांगितले. याशिवाय त्यांनी वाचनकलेबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या लेखकांच्या ग्रंथांचे वाचन करवून घेतले.

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

### अहवाल:  वाचन कौशल्य कार्यशाळा
### इंग्रजी भाषा विभाग
### दिनांक: ७/०१/२०२५

मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या इंग्रजी भाषा विभागाने त्यांच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'रिडींग बेटवीन द लाईन्स: वाचन कौशल्य कार्यशाळा' ०७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९:२० ते १०:२० या वेळेत कक्ष क्रमांक ४०४ मध्ये आयोजित केली होती.

महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक श्री. श्रीपाद सामंत यांनी सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. श्रीपाद सामंत यांनी अँजेला कार्टर यांच्या 'द वेअरवुल्फ' या पुस्तकातील उतारा विद्यार्थ्यांकरिता वाचला व विद्यार्थ्यांना त्यावर चर्चा करण्यास उद्द्युक्त केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मजकुराचे अनेक अर्थ तसेच गर्भितार्थ समजावून सांगितले, तसेच वाचन करताना ते अधिक कौशल्यपूर्ण करण्याकरीता आत्मसात करण्याचे अनेक बारकावे समजावून दिले.

या सत्रात एकूण २२ विद्यार्थ्यांनी सक्रियपणे भाग घेतला. त्यांना वेगवेगळ्या साहित्यिकांच्या गद्याचे विश्लेषण करण्यास शिकवण्यात आले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांची वाचन क्षमता विस्तृत आणि सखोल होण्यास मदत झाली, तसेच समीक्षक, विश्लेषणात्मक विचारसरणी बाबत त्यांना अधिक जाणून घेता आले.

इंग्रजी भाषा विभाग- वाचन कौशल्य कार्यशाळा कार्यक्रमाची क्षणचित्रे

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★


# लेखकांशी संवाद अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत


**अहवाल: लेखकांशी संवाद**
**शास्त्रज्ञ व लेखक पद्मश्री प्रा. रामकृष्ण व्ही. होसूर**
**दिनांक: ८ जानेवारी २०२५, वेळ- दुपारी १२ ते २**
**स्थळ- ऑनलाईन सत्र**

मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या जितेंद्र ग्रंथालय आणि जैवरसायनशास्त्र विभाग यांनी संयुक्तपणे महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी ऑनलाइन पद्धतीने ०८ जानेवारी २०२५ रोजी लेखक-विद्यार्थी संवादाचे आयोजन केले.

या कार्यक्रमाकरिता प्रसिद्ध शास्त्रज्ञ व लेखक पद्मश्री प्रा. रामकृष्ण होसूर यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रा. होसूर यांनी त्यांच्या "When Science Meets Spirituality" या पुस्तकाबाबत विद्यार्थी व शिक्षकांसोबत भाष्य केले. त्यांनी या सत्रात विज्ञान आणि अध्यात्म यांचा मिलाफ समजून घेणे तसेच आधुनिक वैज्ञानिक शोध आणि प्राचीन ज्ञान यांतील सहसंबंध यांवर चर्चा केली. त्यांनी त्यांच्या पुस्तकामध्ये अनेक आध्यात्मिक व्यक्तींच्या वास्तविक जीवनातील उदाहरणांचा समावेश केला आहे. अशा शोधांमुळे समाजाला फायदा झाला. सत्याचा उद्देश केवळ विज्ञान किंवा अध्यात्मापुरता मर्यादित नसून दोन्ही एकत्रित केल्याने मानवी अनुभवाची समज अधिकाधिक प्रखर होऊ शकते यावरही त्यांनी प्रकाश टाकला.

एकूण ५५४ विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या उपस्थितीने हे सत्र यशस्वी झाले. प्रश्नोत्तराच्या सत्राने कार्यक्रमाची समाप्ती झाली. उपस्थितांनी प्रा. होसूर यांच्याशी वैज्ञानिक शोधांमधील एकात्मिक भूमिकेपासून ते दैनंदिन जीवनात हे सर्व कसे उपयुक्त ठरू शकते याबाबतचे विविध प्रश्न विचारले.



# लेखकांशी संवाद अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

### अहवाल:  लेखकांशी संवाद
### शास्त्रज्ञ व लेखक डॉ. बाळ फोंडके
### दिनांक: १४ जानेवारी २०२५,    वेळ- सकाळी १०:३०
### स्थळ- पहिला मजला, सेमिनार हॉल, मिठीबाई स्वायत्त महाविद्यालय

विद्यार्थ्यांमध्ये पुस्तके, लेखन आणि विज्ञान यांची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाने महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी लेखक-विद्यार्थी संवादाचे आयोजन केले होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ, लेखक आणि CSIR-NIScPR (नवी दिल्ली) चे माजी संचालक डॉ. बाळ फोंडके यांना 'संशोधक आणि लेखक म्हणून माझा प्रवास' या व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले होते. यात जवळपास १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

डॉ. फोंडके यांनी आपल्या भाषणाची सुरुवात त्यांच्या शिक्षणाविषयीच्या एका मनोरंजक गोष्टीने केली. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की जरी त्यांनी सेल्युलर बायोफिजिक्सच्या क्षेत्रात दोन दशकांहून अधिक काळ संशोधन केले असले तरी त्यांना जीवशास्त्राचे कोणतेही औपचारिक शिक्षण मिळालेले नाही. पीएचडी करताना आवश्यक असलेले सर्व ज्ञान त्यांनी पुस्तके, मासिके आणि संशोधन लेख वाचून मिळवले. त्यांनी असेही सांगितले की त्यांना अणु भौतिकशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेण्याची प्रेरणा प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ-रसायनशास्त्रज्ञ मॅडम मेरी क्युरी यांचे चरित्र वाचल्याने मिळाली. डॉ. फोंडके यांनी त्यांचा ७० वर्षांचा शास्त्रज्ञ, विज्ञान संवादक आणि लेखक म्हणून झालेला प्रवास, त्यांच्या आयुष्यातील वैयक्तिक किस्से आणि टप्पे यांच्या मदतीने विद्यार्थ्यांना कथन केला.

संपूर्ण सत्रात त्यांनी पुस्तके लक्षपूर्वक वाचण्याचे महत्त्व, चिकित्सक बुद्धी आणि भाषा कौशल्यांचा वापर यावर जोर दिला. चर्चेनंतर प्रश्नोत्तरांचे सत्र झाले, त्यात डॉ. फोंडके यांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.



# लेखकांशी संवाद अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

**अहवाल: लेखकांशी संवाद**
**लेखक श्री. आनंद नीलकंठन**
**दिनांक: १८ जानेवारी २०२५, वेळ- दुपारी १२ ते २**
**स्थळ- पहिला मजला, सेमिनार हॉल, मिठीबाई स्वायत्त महाविद्यालय**

मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या जितेंद्र ग्रंथालय आणि लिटररी सोसायटी यांनी संयुक्तपणे प्रसिद्ध लेखक श्री. आनंद नीलकंठन यांचे लेखक संवाद सत्र विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले होते. श्री. आनंद नीलकंठन यांनी 'असुर: शक्तिशाली साम्राज्याचा अस्त', 'अजेय: दुर्योधनाचे महाभारत - खेळ फाशांचा', कलीचा उदय', 'बाहुबली: शिवगामी कथा', 'भूमीजा सीता' यांसारखी प्रचंड विक्री झालेली पुस्तके तसेच उत्तम बालसाहित्य लिहिले आहे. याव्यतिरिक्त त्यांनी दूरचित्रवाणीवरील अनेक मालिकांचे लेखनही केले आहे. सूत्रसंचालक अद्वितीय घोष यांनी औपचारिकपणे पाहुणे लेखक श्री. आनंद नीलकंठन यांची ओळख करून दिली आणि त्यांच्या उल्लेखनीय साहित्यिक कामगिरी आणि योगदानावर प्रकाश टाकला. श्री. आनंद नीलकंठन यांनी आपल्या संवादातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी त्यांचा लेखन प्रवास विद्यार्थ्यांपुढे उलगडला.इंडियन ऑइल कॉर्पोरेशनमध्ये काम करण्यापासून ते पूर्णवेळ लेखक बनण्यापर्यंतच्या त्यांच्या कारकिर्दीतील संक्रमणाचे त्यांनी रसाळ भाषेत कथन केले.

पुढील सत्राचे रूपांतर प्रश्नोत्तरांच्या एका ज्ञानवर्धक कार्यक्रमात झाले. श्री. नीलकंठन यांनी जागतिक धर्म आणि भारतीय संस्कृतीबद्दल सखोल मत व्यक्त केले. याशिवाय श्री. नीलकंठन यांनी टेलिव्हिजन, चित्रपट आणि बालसाहित्य यांसह विविध लेखन क्षेत्रातील त्यांचे अनुभव सांगितले. त्यांनी लेखकांसमोरील आव्हानांबाबतही चर्चा केली. लेखन हाच रोजगार असण्याबाबतचे फायदे आणि तोटे दोन्हीबाबत त्यांचा दृष्टिकोन सांगितला. कार्यक्रमाअंती उपस्थितांना श्री. नीलकंठन यांच्याशी वैयक्तिक संवाद साधण्याची संधी मिळाली.







# लेखकांशी संवाद अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

**अहवाल: लेखकांशी संवाद**
**लेखक डॉ. अजय पालेकर**
**दिनांक: १३ जानेवारी २०२५, वेळ- सकाळी ११:३० ते दुपारी १२:३०**
**स्थळ- पहिला मजला, भौतिकशास्त्र विभाग, मिठीबाई स्वायत्त महाविद्यालय**

उपक्रमाअंतर्गत मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागाने दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी लेखक-विद्यार्थी संवादाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमातून आर.डी. नॅशनल महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक व लेखक डॉ. अजय पालेकर यांनी "आईन्स्टाईनचा प्रवास: कार्य आणि जीवन" या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यात जवळपास ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.डॉ. पालेकर यांनी भौतिकशास्त्राच्या क्षेत्रात विशेषत: अल्बर्ट आइनस्टाईनवरील सखोल संशोधनाद्वारे महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. न्यूक्लियर फिजिक्स या पुस्तकाचे ते लेखक आहेत. त्यांना ऑक्सफर्ड विद्यापीठासारख्या नामांकित संस्थेमधून शिष्यवृत्ती देखील मिळाली आहे. त्यांनी त्यांच्या व्याख्यानातून आईन्स्टाईनच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. या संवादातून त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की त्यांना ज्या विषयाची आवड आहे त्याबाबत त्यांनी सातत्याने व अधिकाधिक ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न करायला हवा, ज्यायोगे त्या विषयात ते यशस्वी व तज्ज्ञ होतील. त्यांच्या व्याख्यानाने विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान प्राप्त करून घेण्याची प्रेरणा मिळाली.




# लेखकांशी संवाद अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

### अहवाल: लेखकांशी संवाद
### लेखिका डॉ. ज्योती व्होरा
### दिनांक: १४ जानेवारी २०२५, वेळ- दुपारी १२ ते २
### स्थळ- पहिला मजला, जैवरसायनशास्त्र विभाग, मिठीबाई स्वायत्त महाविद्यालय

महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या जैवरसायनशास्त्र विभागाने दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध जैवरसायनतज्ज्ञ लेखिका डॉ. ज्योती व्होरा (फेलोशिप ऑफ द सोसायटी ऑफ सायन्स अवॉर्डी, एमएएसएफएफबीसी, हार्वर्ड मेडिकल स्कूल, यूएसए) यांना लेखक-विद्यार्थी संवादासाठी आमंत्रित केले होते.

"My journey with a Quill" या व्याख्यानातून लेखिका डॉ. ज्योती व्होरा यांनी वाचनामुळे (पारंपरिक पद्धतीतील वाचन तसेच ब्लॉग सारखे तंत्रज्ञानासमवेत वाचन) होणारी शैक्षणिक आणि वैयक्तिक वाढ यांबद्दल भाष्य केले. वाचनामुळे कशाप्रकारे सर्जनशील होता येऊ शकते यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सतत वाचत राहण्याचा मौल्यवान सल्ला दिला. त्यांनी असेही सांगितले की वाचक हा कधीही एकटा नसतो तर त्याला पुस्तकांची सदैव सोबत असते तसेच सतत वाचन केल्याने वाचणाऱ्यांच्या ज्ञानात सातत्याने वृद्धी होत राहते. या चर्चासत्रामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी डॉ. व्होरा यांना विविध प्रश्न विचारून आपले शंकानिरसन करून घेतले.







# लेखकांशी संवाद अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

**अहवाल: लेखकांशी संवाद**
**लेखिका रुपांगी शर्मा**
**दिनांक: ८ जानेवारी २०२५, वेळ: १०:३० ते १२:००**
**स्थळ- वाचन कक्ष, जितेंद्र ग्रंथालय, मिठीबाई स्वायत्त महाविद्यालय**

मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या जितेंद्र ग्रंथालय व लिटररी सोसायटी यांनी संयुक्तपणे दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी 'यंग इनोव्हेटर्स, आंत्रप्रेन्योर्स अँड चेंजमेकर्स' या पुस्तकाच्या लेखिका तसेच EFG लर्निंगच्या संस्थापिका रूपांगी शर्मा यांच्यासमवेत 'लेखकांशी संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लेखिका रूपांगी शर्मा त्यांच्या पुस्तकात नमूद केलेल्या दोन नवउद्योजकांनी म्हणजेच हीलसायकलच्या संस्थापिका अनन्या ग्रोव्हर आणि वन थेराक्योरचे संस्थापक श्री. रुतिक थोरात यांनीही या कार्यक्रमास उपस्थिती लावली. लेखक संवाद कार्यक्रमास २०० विद्यार्थी उपस्थित होते. लिटररी सोसायटी तर्फे सहाय्यक प्राध्यापिका डॉ. श्वेता सालियन यांनी सदस्यांचे स्वागत केले. लेखिका रूपांगी शर्मा आणि श्री. रुतिक थोरात प्रत्यक्ष उपस्थित होते, तर अनन्या ग्रोव्हर या ऑनलाइन प्रणालीद्वारे सत्रात सामील झाल्या. सत्राची सुरुवात वक्त्यांनी स्वतःची ओळख करून देऊन आणि प्रेक्षकांना त्यांच्या कार्याचा आणि प्रेरणांचा आढावा देऊन केली. लेखिका रूपांगी शर्मा यांनी तरुणांनाही नवोन्मेषक होता येऊ शकते या कल्पनेवर भर दिला. त्यांनी त्यांच्या लेखन प्रवासात कोविड-१९ साथीच्या काळात ज्या ६५ तरुण नवोन्मेषकांशी संभाषणे झाली त्यांबद्दल थोडक्यात सांगितले, आणि या संभाषणातूनच त्यांना पुस्तक लिहिण्यास मिळालेल्या प्रोत्साहनाबद्दलही थोडक्यात चर्चा केली.

या सत्रात विचारप्रवर्तक चर्चा झाल्या. उपस्थितांच्या विविध प्रश्नांवर उत्तरे देताना त्यांनी सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व, आत्मविश्वास वाढविणे आणि इतरांना मदत करता येण्यासाठी आर्थिक मदतीचे स्रोत मिळवणे यासारख्या विषयांवरही जोर दिला. कार्यक्रमाची सांगता नवोन्मेषकांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या मौल्यवान सूचनांनी झाली. या संवादात्मक कार्यक्रमाने उपस्थित विद्यार्थ्यांना नावीन्याचा ध्यास, चिकाटी बाळगणे आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी धडपडणे यांची प्रेरणा दिली.






# लेखकांशी संवाद अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

**अहवाल: लेखकांशी संवाद**
**लेखक लेखक डॉ. दशरथ पटेल**
**दिनांक: १२ जानेवारी २०२५, वेळ: दुपारी ०२:३० ते ०३:३०**
**स्थळ- नाईक फाउंडेशन, सफाळे, तांदुळवाडी**

महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाने विविध उपक्रम राबवले. NSS च्या सफाळे, तांदुळवाडी येथे भरविण्यात आलेल्या निवासी शिबिरात महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक व भारतीय भाषा विभाग प्रमुख तसेच लेखक डॉ. दशरथ पटेल यांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी १२ जानेवारी २०२५ रोजी आमंत्रित केले होते.

डॉ. पटेल यांनी त्यांच्या संवादातून सर्व भाषांमध्ये विविधता असली तरी त्यातील समृद्धी कशाप्रकारे विविध प्रदेश आणि पार्श्वभूमीतील लोकांना जोडण्याचे काम करतात यावर प्रकाश टाकला. सांस्कृतिक वारसा जपण्यातील भाषेची भूमिका, बहुसांस्कृतिक समाजात एकोपा वाढविण्यातील भाषेची मदत यांची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली. त्यांच्या सत्रात त्यांनी वाचनामुळे भाषेचा विकास कसा होतो यावरही भर दिला. या संवादात्मक चर्चेत डॉ. पटेल यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या भाषांचा अभ्यास करून त्या समजून घेणे व आत्मसात करणे यासाठी प्रेरणा दिली.



# लेखकांशी संवाद अंतर्गत उपक्रमांचे वृत्तांत

**अहवाल: लेखकांशी संवाद**
**लेखक श्री. असीम चाफळकर**
**दिनांक: १५ जानेवारी २०२५, वेळ: दुपारी १२:३० ते ०१:३०**
**स्थळ- वर्ग ३०६, मिठीबाई स्वायत्त महाविद्यालय**

मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातील सहायक प्राध्यापक व लेखक श्री. असीम चाफळकर यांनी विद्यार्थ्यांना पुस्तके, लेखन आणि विज्ञान समजून घेऊन त्याची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी 'लेखकांशी संवाद' या कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

डिसेंबर २०२१ मध्ये श्री. असीम चाफळकर यांना मराठीत विज्ञान विषयावर पुस्तक लिहिल्याबद्दल 'शरद पवार इन्स्पायर शिष्यवृत्ती' मिळाली. त्या शिष्यवृत्तीमुळे त्यांनी २०२३ मध्ये "आधुनिक जीवशास्त्राची साधने: जनुककोश शास्त्र" हे पुस्तक लिहिले. श्री. चाफळकर यांनी विज्ञानाला समाजाशी जोडणाऱ्या प्रसिद्ध व्यक्तींची भाषणे ऐकून त्यांना कोविड-१९ च्या आव्हानात्मक काळात विज्ञानाबद्दल लिहिण्याची प्रेरणा कशी निर्माण झाली याबद्दल विद्यार्थ्यांना सांगितले तसेच त्यांच्या पुस्तकातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. त्यांनी तांत्रिक वैज्ञानिक संज्ञांसाठी नवीन मराठी शब्द कसे तयार केले याबाबतीतही चर्चा केली. त्यांनी विद्यार्थ्यांना पुस्तक लेखन प्रक्रियेबद्दल तसेच पुस्तक शास्त्रीय पद्धतींवर आधारित होण्याकरिता विविध प्रकारचे संदर्भ वापरणे यांबाबत मार्गदर्शन केले. उपस्थित विदयार्थ्यांना स्थानिक भाषेत लोकप्रिय-विज्ञान पुस्तक लिहिणे आणि प्रकाशित करणे यांबाबत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. विद्यार्थ्यांनी या संदर्भात विविध प्रश्न विचारून चर्चेत सक्रिय सहभाग घेतला.



# निबंध लेखन स्पर्धेचा अहवाल

मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या जितेंद्र ग्रंथालयाद्वारे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' ह्या उपक्रमाअंर्तगत महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले गेले. सदर स्पर्धा १६ जानेवारी २०२५ रोजी वर्ग क्र. ४०३ व ४०८ मध्ये आयोजित करण्यात आली होती. ह्या स्पर्धेमध्ये कला, विज्ञान व वाणिज्य ह्या शाखांमधील एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे होते:

१. पुस्तके व इ-पुस्तके (Books Vs. e-books)

२. शैक्षणिक वाचन व मनोरंजनात्मक वाचन (Reading for fun Vs. Academic reading)

या स्पर्धेसाठी सहाय्यक प्राध्यापक श्री. सच्चीदानंद सिंग व सहाय्यक प्राध्यापिका श्रीमती प्रिया जोसेफ यांनी परीक्षकांचे काम केले. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी याकरिता स्पर्धेतील सर्वोत्कृष्ठ तीन निबंधास बक्षीस म्हणून रोख रक्कम अनुक्रमे रु. १०००, रु.७५० व रु. ५०० व प्रशस्तीपत्रक देण्यात आले. कु. जीत शाह यांस 'मनोरंजनपर वाचन की शैक्षणिक वाचन' या विषयावरील उत्कृष्ट निबंधास प्रथम पारितोषिक मिळाले. 'पुस्तके की ई-पुस्तके' या विषयांवरील निबंधास कु. अझीम फातेमा यांना द्वितीय तर कु. मधुरा हेजमाडी यांस तृतीय पारितोषिक मिळाले.

**कार्यक्रमाच्या पुरस्कार वितरणाची क्षणचित्रे**




**प्रथम पारितोषिक : कु. जीत शाह**




**द्वितीय पारितोषिक : कु. अझीम फातेमा**

# भित्तीपत्रक (Poster Making) स्पर्धेचा अहवाल

मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयातील जितेंद्र ग्रंथालयाच्या ग्रंथपाल सौ. अर्चना गराटे यांनी'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' ह्या उपक्रमाअंतर्गत ४ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमांअंतर्गत दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या आवारात सर्व विद्यार्थ्यांसाठी भित्तीपत्रक बनविण्याची (Poster Making) स्पर्धा आयोजित केली होती. ह्या स्पर्धेमध्ये कला, विज्ञान व वाणिज्य ह्या शाखांमधील एकूण ३६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे होते:

१. आदर्श ग्रंथालय (Ideal Library)

२. आदर्श वाचक (Ideal Reader)

३. माझे आवडते लेखक (My favourite author)

४. माझी आवडती पुस्तकांची शैली (My favourite genre of books)

या स्पर्धेसाठी सहाय्यक प्राध्यापक श्री. श्रीपाद सामंत, सहाय्यक प्राध्यापक डॉ. आशिष गावंडे व सहाय्यक प्राध्यापिका डॉ. स्वरूपा भाटिया यांनी परीक्षकांचे काम केले. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी याकरिता स्पर्धेतील सर्वोत्कृष्ठ तीन भित्तिपत्रकांकरिता बक्षीस म्हणून रोख रक्कम अनुक्रमे रु. १०००, रु. ७५० व रु. ५०० व प्रशस्तीपत्रक देण्यात आले.



**मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या प्राचार्या, प्रोफ. कृतिका देसाई, स्पर्धेतील भित्तीपत्रके पाहताना**

## भित्तीपत्रक (Poster Making) स्पर्धेच्या पुरस्कार वितरणाची क्षणचित्रे







प्रथम पारितोषिक : कु. सबा रिझवी









द्वितीय पारितोषिक : कु. अझीम फातेमा आणि कु. कविता प्रजापती







तृतीय पारितोषिक : कु. प्रियांका मोरजकर


# स्पर्धेकरिता सादर करण्यात आलेली भित्तीपत्रके


























IDEAL READER
The More you READ
The More you'll KNOW
The More you'll GROW
THE MORE PLACES YOU'LL GO!


EXPLORING MYTHS WITH DEVDUTT PATTANAIK....
DEVDUTT PATTANAIK SITA RAMAYANA
DEVDUTT PATTANAIK JAYA MAHABHARATA
DEVDUTT PATTANAIK SHIKHANDI
DEVDUTT PATTANAIK MYTH=MITHYA
MYTHOLOGY IS NOT JUST ABOUT STORIES; IT IS ABOUT UNDERSTANDING THE HUMAN EXPERIENCE.....
WHY HINDU GODS DANCE AND THOSE IN OTHER RELIGIONS DON'T
MANY IDENTITIES OF GOD
DEVLOK MINI WITH DEVDUTT PATTANAIK


IDEAL LIBRARY
OPEN A BOOK GROW YOUR MIND
When in DOUBT Go to THE Library
KNOWLEDGE IS FREE AT THE LIBRARY





IDEAL
A READER LIVES A THOUSAND LIVES BEFORE HE DIES


William Shakespeare


READING IS AN BEAUTIFUL ADVENTURE THAT NEVER ENDS
IN E-LIBRARY, KNOWLEDGE HAS NO BOUNDARIES AND LEARNING HAS NO LIMITATION
LIBRARIES ARE WHERE BOOKS BREATHE AND READERS CONVERSE WITH HISTORY
E-LIBRARY INFINITE
OFFLINE LIBRARY TIMELESS


ADVENTURE • MYSTRY • FICTIONAL


SHERLOCK HOLMES
ADAPTED FROM THE WRITINGS OF Sir ARTHUR CONAN DOYLE
SHERLOCK HOLMES
HOLMES PURSUES A MASTERMIND OF EVIL IN "The FINAL PROBLEM" "The ADVENTURE of the EMPTY HOUSE"

# वेशभूषा (Cosplay) स्पर्धेचा अहवाल

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' ह्या उपक्रमाअंतर्गत मिठीबाई स्वायत्त महाविद्यालयाच्या जितेंद्र ग्रंथालय आणि लिटररी सोसायटी यांच्या संयुक्त उद्यमाने सर्व विद्यार्थ्यांसाठी वेशभूषा (Cosplay) स्पर्धा दिनांक १६.०१.२०२५ रोजी आयोजित करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीच्या पुस्तकातील पात्राप्रमाणे वेशभूषा करून त्या पुस्तकातील एक-एक प्रसंग सादर केला. ह्या नाविन्यपूर्ण स्पर्धेमध्ये मुलांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी सहाय्यक प्राध्यापक पंकज कटारिया, सहाय्यक प्राध्यापिका जयश्री रवी व सहाय्यक प्राध्यापिका गायत्री लेले यांनी परीक्षकांचे काम केले. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी याकरिता स्पर्धेतील सर्वोत्कृष्ठ तीन वेषभूषेस बक्षीस म्हणून रोख रक्कम अनुक्रमे रु. १०००, रु. ७५० व रु.५०० व प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

**कार्यक्रमाच्या पुरस्कार वितरणाची क्षणचित्रे**




**प्रथम पारितोषिक : कु. शान्वी चौधरी**




**द्वितीय पारितोषिक : कु. पार्थ गोहिल**





**तृतीय पारितोषिक : कु. स्वरा औघडे**

# प्रश्नमंजुषा (Quiz) स्पर्धेचा अहवाल

प्रश्नमंजुषा या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अर्थशास्त्र, इंग्रजी, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, संगणक विज्ञान, गणित, सांख्यिकी, प्राणिशास्त्र या विभागांतर्फे विभागीय स्तरावर प्रश्नमंजुषा (Quiz) स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांना वाचलेल्या पुस्तकातील माहितीची पुनरुक्ती करता यावी तसेच त्यांना वाचनाची गोडी लागावी या हेतूने सदर स्पर्धा आयोजित केल्या होत्या. ह्या स्पर्धांमध्ये मुलांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची विभाग निहाय माहिती पुढीलप्रमाणे:

| अनुक्रमांक | विभाग | सहभागी विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | अर्थशास्त्र | २५ |
| २ | इंग्रजी (Foreign Languages) | ९६ |
| ३ | वनस्पतीशास्त्र | ४९ |
| ४ | रसायनशास्त्र | ६१ |
| ५ | संगणक विज्ञान | ६ |
| ६ | गणित | १७ |
| ७ | सूक्ष्मजीवशास्त्र | ६८ |
| ८ | सांख्यिकी | १८ |
| ९ | प्राणिशास्त्र | २७ |
| **एकूण** | | **३६७** |










# पुस्तक परीक्षण

## श्यामची आई

### लेखक: साने गुरुजी



**आ**ई... प्रेमाची, रागाची, मायेची, त्यागाची, हसण्याची अन् सोसण्याची एकमेव जागा. हक्काने कोणतीही गोष्ट आपण बोलू शकतो तिच्याशी. त्यामुळे आपल्या सगळ्यांचीच आईशी एक वेगळी नाळ जोडलेली असते. जगाला माहित होण्या आधी नऊ महिने आपली तिच्याशी ओळख होते... आपली इवली बाळमुठ हातात घेऊन आपल्यासाठी कितीतरी सहन करण्यासाठी आईचच काळीज हवं. अशाच एका आई-मुलाच्या निर्मळ नात्याच हे पुस्तक. लहानपणात कठोर आणि प्रेमळ या दोन्ही पद्धतीने केलेल्या संस्कारांची ही एक छोटीशी गोष्ट आहे. यातील प्रत्येक पाठातून नक्कीच उत्तम बोध मिळतो. आणि तो बोध कसा द्या वा याचीही शिकवण अगदी सुंदर मांडली आहे.

**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY**
**CALL NUMBER OF THIS BOOK**
**M 891.463 081 / SAN**

साने गुरुजींनी जीं म्हटल्याप्रमाणे हे पुस्तक आईच्या प्रेममय थोर शिकवणुकीचे सरळ, साध्या व सुंदर संस्कृतीचे एक करूण व गोड कथात्मक चित्र आहे. हे पुस्तक पवित्र आहे जिव्हाळ्याने ओतप्रोत आहे. आणि आचार्य अत्रे म्हणातात तसे हे पुस्तक म्हणजे महामंगल स्तोत्र आहे. याबद्दल जितकं लिहावं तितकं कमीच आहे. गुरुजींनी जीं तुरुंगात लिहलेल्या या सर्वच रात्री तुम्हाला गहीवरून आणतील. यातील प्रत्येक रात्र नवीन बोध कसा देते यात एक वेगळीच गम्मत आहे. स्वतःच अस्तित्व निर्माण करण्यामधे सर्वांनाच याचा उपयोग होईल. मुकी फुले देवास ही आवडत नाहीत. पायस घाण लागू नये म्हणून जसा जपलास तसे मनास घाण लागू नये म्हणून जप सांगणारी आई लुगडे अंथरते तेंव्हा डोळ्यांत साठलेलं पाणी ओसांडून वाहते. पत्रावळ, भूतदया, अशा अनेक कथांनी हे पुस्तक वेलीप्रमाणे फुलले आहे. श्यामला पोहता यावे यासाठीचा आईचा आटापिटा, स्वाभिमान, मिंधेपणा यांची जवळून ओळख. बंधुप्रेमाची शिकवण चिंधीच्या गाण्यातून वाचताना अंगावर शहारे येतात. तर उदार पितृहृदय वाचताना प्रत्येक बापाने केलेल्या कष्टाचे चीज होते असे मी म्हणेन.

"घनदाट या रानात, धो धो स्वच्छ वाहे पाणी, माझ्या श्यामच्या जीवनी, देव राहो ||"

यातील करुणा भाव मनाला सतत जाणीव देत राहतो. तर सांब शिवा पाऊस दे... बोलणाऱ्या इवल्याश्या ओठातून स्वतः कोणत्याही गोष्टीसाठी कसे झटावे, कसे आपल्या परीने मदत करावी हेच दिसून येते. या पुस्तकातील सगळच अगदी साफ, निरागस मनाने वाचावं अस आहे. सुखदुःखाच्या पलिकडे जाऊन, मातीशी एकरूप झालेल्या अनेक कथांची ही एक माळ आहे. जी तुम्हाला समृद्ध करेल. तुम्हाला देखिल हे पुस्तक वाचताना मनाचा एक कोपरा नक्की सापडेल.


समीक्षक : अक्षय सतीश गुधाटे

https://www.insidemarathibooks.in/index.php/2020/01/04/review-shyamchi-aai-marathi-book/

# पुस्तक परीक्षण

## एक हो ता कार्व्हर

### लेखिका: वीणा गवाणकर



**ज**गाच्या पाठीवर जगणाऱ्या प्रत्येकास जस हवं तस जगायला मिळत का?? आणि ज्यांना मिळतं, त्यांना त्याची किंमत आहे का? सर्वांच्या आयुष्यात काहीना काही विरोधाभास किंवा कमतरता ही असतेच. काही लोक म्हणतील यालाच तर आयुष्य म्हणतात ना?? हो अगदी खरंय… पण हेच जर मानवनिर्मित असेल तर? माणसानेच दुसऱ्या माणसासस जखडून ठेवायचा प्रयत्न केला असेल तर? आपणच जर लोकांना कमी लेखत असेल तर? असे अनेक प्रश्न, विविध विचार आणि नवनवीन दृष्टिकनातून विचार करायला लावणारं हे पुस्तक एक आहे.

**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY**
**CALL NUMBER OF THIS BOOK**
**M 925/ GAV**

वीणा गवाणकर यांनी लिहिलेल्या “एक हो ता कार्व्हर” हे पुस्तक जगातील कटू सत्याची जाणिव म्हणा.. किंवा दर्शन म्हणा, देत राहते. लिखाण इतके उत्कृष्ट आहे आणि त्याने पुस्तकाचा मूळ गाभा अजून खुलवला आहे. लेखिका नक्कीच पुस्तकास न्याय मिळवून देते. एक अमेरिकी निग्रो माणूस, ज्याचा जन्म खर तर गुलाम बनून लोकांची सेवा करण्यासाठी झाला होता, त्याने स्वबळावर आपल्या जिज्ञासू वृत्तीने, चिकाटी दाखवून सगळ्यांना अवाक् करणाऱ्या काही गोष्टी कशा केल्या, याची कौतुकास्पद गोष्ट म्हणजे हे पुस्तक आहे. आणि फक्त एकच नाही तर सर्व क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कामांची यादी आपल्याला निशब्द करून टाकते.

वर्णभेद हा त्या काळातील अमेरिकन लोकांमधील एक खूप मोठा आणि लाजिरवाणा प्रकार होता. कृष्णवर्णीय लोकांना तिथं खालचा दर्जा दिला जात असे, अशातच एका लहानशा मुलाचा, डोळे विस्फारून टाकणारा सौम्य लढा, आपल्या हृदयावर बराच खोल घाव करून जातो. नशिबात लिहलेले सगळे बदलता येते, स्वतचं जीवन हवं तसच जगू शकता येते याच एक उत्तम उदाहरण म्हणजे “जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर” आणि त्यांच्या जीवनातील अनेक पैलूंच दर्शन लेखिकेने करून दिले आहे.

हे पुस्तक तुम्हाला जगायला शिकवेल, जीवन आत्मज्ञानानं सजवायला शिकवेल, हसत खेळत रंगवायला शिकवेल आणि त्याचा आनंद अगदी मोठ्या मनानं लुटायला तर शिकवेलच, पण त्याहूनही तो दुसऱ्यांच्या वाट्यालाही यावा, यासाठी लढायला ही शिकवेल. हे पुस्तक समजाच्या विषमतावादी विचारांच्या गर्तेत एक मैलाचा दगड आहे. सर्वांनी नक्कीच वाचावं असं हे पुस्तक आहे. पुस्तकाच्या मागील मुद्दा मनात हुरहूर लावण्यात नक्कीच यशस्वी होतो अस म्हणावं लागेल.

अधिकाधिक उपभोगांच्या हव्यासमुळे, एका विचित्र वळणावर सारी मानवजात येऊन ठेपली आहे. आता आपल्या सर्वांपुढे केवळ दोनच पर्याय उरलेले आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनाश करणाऱ्या आजवरच्या या आत्मघातकी मार्गावर हताशपणे वाटचाल करायची किंवा मागे फिरून कर्व्हारने दाखवलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धन-विकास-उपयोग-पुनर्भरण या शाश्वत कृषीसंस्कृतीचा स्वीकार करायचा. भावी पिढ्यांच्या सुख-समृद्धीचा पाया घालायचा असेल तर प्रत्येक सुजाण नागरिकाने वाचायलाच हवे असे पुस्तक.


समीक्षक : अक्षय सतीश गुधाटे

https://www.insidemarathibooks.in/index.php/2020/01/04/review-shyamchi-aai-marathi-book/

# पुस्तक परीक्षण

## अग्निपंख

### लेखक: डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम
### अनुवाद: माधुरी शानभाग




"**अ**ग्निपंख हे पुस्तक डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यावर आधारित श्री अरुण तिवारी यांच्या “विंग्ज ऑफ फायर” या मूळ पुस्तकाचा मराठी अनुवाद आहे. माधुरी शानभाग यांनी याचा मराठी अनुवाद केलेला आहे. डॉ. कलाम यांनी त्यांचा जीवनप्रवास कथन करून वाचकाला स्वतःची आंतरिक आग आणि क्षमता ओळखण्यास उद्युक्त केले, कारण त्यांचा असा ठाम विश्वास होता की आपल्यापैकी प्रत्येकजण जगात मूर्त बदल घडवून आणण्याची ताकद आणि क्षमता घेऊन जन्माला आला आहे. स्वप्ने साध्य करण्यासाठी त्याने स्वतःला कशी प्रेरणा दिली आणि ते कसे पूर्ण करत गेले हे ह्या पुस्तकामध्ये छान टिपले आहे.

**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY**
**CALL NUMBER OF THIS BOOK**
**M 925/ KAL/ SHA**


डॉ. कलाम यांना नव्या तंत्रज्ञान भारताचे जनक म्हणायला हरकत नाही. कारण भारताला तंत्रज्ञानाच्या दृष्टीने समृद्ध करण्यात डॉ. कलाम यांचा सिंहाचा वाटा आहे. मानवी इतिहासाचा जर आपण नीट विचार केला तर मानवी इतिहासात माणूस हा प्रत्येक लढाईसाठी सिद्ध असतो. सुरुवातीच्या काळात मानवी टोळ्यांमध्ये अन्न आणि निवारा साठी युद्ध होत. मग पुढे धर्मावरून युद्ध सुरू झाले. आताचा काळ हा तंत्रज्ञानाचा आहे. प्रत्येक देश तंत्रज्ञानाच्या जोरावर एकमेकांवर वर्चस्व गाजू पाहतोय. मग सव्वाशे करोड लोकसंख्या असलेल्या देशाला स्वतःला सिद्ध करण्यासाठी तंत्र ज्ञान अतिशय गरजेचं होतं. हि सिद्धता करायची कला कलामांनी ठरवली. आणि आज भारत क्षेपणास्त्रामध्ये तोडीच तोड आहे. हि जिद्द आली कुठून, हि भावना येते कुठून, सर्वसामान्य भारतीय मुलासारखे वाढलेले ,ज्यांना अन्न वस्त्र निवारा ची कमतरता नाहीये, पण त्याही पलीकडे लागतं ते प्रत्येकाला मिळत नाही. शिक्षणासाठी मैलोमैल चालत जाणं हे डॉ. कलाम यांच्याही नशिबी आलं.

भेदभाव त्यांनीही सहन केला. अपेक्षा भंग त्यांच्याही झाल्या. पण ते ह्या सगळ्या पलीकडे होते. या आत्मचरित्रात एका बाजूला व्यक्तिगत आणि व्यवसायिक संघर्ष चित्र साकारलेलं आहे. पण त्याच सोबत अग्नी, आकाश, पृथ्वी, त्रिशूल, नाग अशी नावे घरोघरी पोहोचलेल्या क्षेपणास्त्रांची जडणघडण सुद्धा सांगितलेली आहे. या आत्मचरित्राच्या माध्यमातून कलमांच्या जीवनातील व्यक्तिगत ते गोष्टी करतात पण त्याच सोबत त्यां गोष्टींचा संदर्भ दिल्याने त्यांच्या व्यक्तित्वाबद्दल कल्पना येते. डॉ. कलाम हे आधुनिक भारतातील धर्मनिरपेक्षतेचे अग्रणी उदाहरण आहे. त्यांची ईश्वरी शक्तीवर निष्ठा होती. विज्ञाननिष्ठ असून सुद्धा त्यांचा अहंकार न बाळगता आपण निर्माण केलेली गोष्ट यात आपलं फारसे योगदान नसून ईश्वरी कृपेने झाली असे सांगून स्वतःवरील यशाचा भार कमी करणे त्यांनी केव्हाही पसंत केले. अशा प्रकारचा आदर्शवादी पुरुष इतिहासात क्वचितच आढळेल.

हे पुस्तक एका कष्टकरी कुटुंबात जन्मलेल्या एका सामान्य माणसाचा भारताचे राष्ट्रपती होण्यापर्यंतचा प्रवास आहे आणि हे आत्मचरित्र त्याच्या स्वतःच्या काळातील सर्वात प्रेरणादायी मानले जाते. या पुस्तकात एका दूरदर्शी नेत्याचा प्रवास वर्णन केला आहे ज्याची कृती त्याच्या शब्दांपेक्षा कितीतरी जास्त आहे.

From https://360pdfs.com/agnipankh-book-review-in-marathi/

# पुस्तक परीक्षण




## इकिगाई:
### दीर्घायुषी, निरोगी आणि आनंदी जीवनाचे जपानी रहस्य

**लेखक: हेक्टर गार्सिया, फ्रान्सिस मिरेलस**
**अनुवाद: प्रसाद ढापरे**

"**म**धल्या काळात अचानक काही पुस्तकांची चर्चा जगभर झाली. त्यातलाच हे एक पुस्तक. बोलता बोलता या पुस्तकाने सगळीकडेच छाप उमटवली. पुस्तकात नेमकं काय आहे याचं सगळ्यांनाच एक कोड पडलं होत. अनेकांचं या पुस्तकाबद्दल दुमत आहे. मला वाटतं सगळ्यांनी हे आपापल्या परीने पहावं.

**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY**
**CALL NUMBER OF THIS BOOK**
**158.1 / GAR/ MIR**

इकिगाई (दीर्घायुषी, निरोगी आणि आनंदी जीवनाचे जपानी रहस्य) हे पुस्तक हेक्टर गार्सिया, फ्रान्सिस मिरेलस यांनी लिहिलेले असून या पुस्तकाचा मराठी अनुवाद प्रसाद ढापरे यांनी अतिशय सोप्या आणि सरळ भाषेत मराठी वाचकांसा ठी उपलब्ध करून दिला आहे.

या पुस्तकात केवळ दीर्घ जीवन जगण्याचा हव्यास नाही तर अर्थपूर्ण जीवन! आनंदी जीवन! सुखी जीवन जगण्याची कला सांगितली आहे. प्रत्येकाने स्वतःचा इकिगाई शोधून जीवनात सतत कार्यरत राहल तर आयुष्य जगताना एक वेगळाच आनंद प्राप्त होतो. जीवनाला एक वळण प्राप्त होते. म्हणजे त्यानी निवडलेले काम तो तल्लीन होऊन पूर्ण करतो. इकिगाई म्हणजे नेमकं काय तर, ‘इकिगाई’ या जपानी शब्दाचा मूळ अर्थ “स्वतःच्या अस्तित्वा मागील कारण”. इकिगाई म्हणजेच नेमक्या कोणत्या गोष्टीसाठी आपण जन्माला आलो आहोत हे शोधणे.

सामान्य लोक अयशस्वी असण्याचे सर्वात मोठे कारण हेच आहे की ते स्वतःला तसेच स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला चांगल्या प्रकारे ओळखत नाहीत. या पुस्तकाच्या मागचा हेतू हाच आहे की स्वतःचा इकिगाई कसा सापडू शकतो हे रहस्य हेक्टर गार्सिया आणि फ्रान्सिस मिरेलस यांनी जापनीज लोकांच्या मुलाखतीतून सामान्य जनतेस पोहोचवण्याचा अंतरभावाने प्रयत्न केला आहे. इकिगाई चे तत्व, वय न वाढण्याचे रहस्य, लोगो थेरेपी ते इकिगाई, प्रवाहाचा शोध, दीर्घायुषी मास्टर्स, जपानमधील शतायुषी लोकांची शिकवण, इकिगाई खाद्यसंस्कृती, दृढता आणि वाबी-साबी इत्यादी विभागात इकिगाईचे संपूर्ण रहस्य ते उलगडतात.

साहित्यिक भाषा, मोठेमोठे शब्द,अलंकार या पुस्तकात असं काहीही पाहायला व वाचायला मिळत नाही. परंतु एक प्रेरणादायी पुस्तक म्हणून जापनीज लोकांची संस्कृती, राहणीमान किंवा त्यांनी मुलाखतीत सांगितले जीवनाचे रहस्य चित्रित केले आहे. त्यामुळे पुस्तक सोपे व वाचनीय झाले आहे.


समीक्षक : कुमार विश्वजीत

https://www.insidemarathibooks.in/index.php/2020/01/04/review-shyamchi-aai-marathi-book/

# पुस्तक परीक्षण

## हसरे दुःख

### लेखक: भा. द. खेर




"हसरे दुःख एक महान मूक अभिनय सम्राटाच्या जीवनावरील कादंबरी वाचताना अनेक प्रसंग मनाला भावतील आणि वाचकांमध्ये एक वेगळी उमेद निर्माण होऊन परिस्थितीसमोर न झुकता अपार कष्ट करून जीवनाची उंची गाठण्यास मदत होईल म्हणून वाचकांनी चार्लीचॅप्लिनचे आत्मकथन एकदा जरूर वाचावे.

**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY**
**CALL NUMBER OF THIS BOOK**
**M 791.430 92 /KHE**

लोकांना नेहमी चार्लीचॅप्लिनच्या चेहऱ्यावरचे बालिशपण, निरागसता दिसते पण त्यामागचे दुः ख कोणालाच दिसत नाही. पाच वर्षांच्या चार्लीने आईच्या गाण्याचा कार्यक्रम बंद पडू नये म्हणून रंगमंचावर प्रवेश केला तर तो कायमचाच. अतिशय हलाखीच्या परिस्थितीत, कष्टमय बालपण, गरिबीशी झुंज देता-देता आईला अधून मधून येणारा वेडाचा झटका, वयाने मोठा असलेला सावत्र भाऊ सिडने याच्या अतोनात प्रेमाच्या बळावर आणि परिस्थिती जरी वाईट असली तरी आईच्या सुसंस्कृत संस्कारामुळे चार्लीच्या अंधकारमय जीवनात सतत प्रकाश पडत राहिला. सतत होणाऱ्या या काळाच्या आघातामुळे, या दुःखमय प्रसंगातून, दारिद्र्यातून एक प्रगल्भ कलाकार आकार घेत होता आणि त्याच्या कलेला करुणेची झालर चढत होती.

प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये कधी ना कधी भाग्याचा दिवस येतोच. तसा चार्लीच्याही आयुष्यात उगवला. एका पात्रासाठी त्याच्या दिग्दर्शकाने त्याला विनोदी पोषाख करायला सांगितला व तू विनोदी दिसायला पाहिजे असं बजावलं गेलं, तेव्हा त्याने वेशभूषेच्या खोलीत जाऊन मोठी ढगळ विजार अंगावर चढवली. बॅगी पॅन्टवर तंग जॅकेट आणि तंग कटवे कोट, डोक्याच्या आकारापेक्षा छोटी डबी हॅट, हातामध्ये काठी, पायाच्या आकारापेक्षा मोठे शूज आणि या वेशभूषे सोबतच ती फेंगडी आगळीवेगळी चाल अशी संपूर्ण विनोदी व्यक्तिरेखा त्याने उभी केली. या विनोदी वेक्तिरेखेने पुढे ट्रॅप म्हणून जगात प्रेक्षकांच्या मनात घर केले.

आश्चर्याची गोष्ट ही की हुकूमशहा हिटलर आणि चार्ली यांचा जन्म एकाच आठवड्यातला. एकाने लाखो माणसं युद्धाच्या दरीत लोटून अनेक संसार उद्ध्वस्त केली, तर दुसऱ्याने त्याच लोकांना हसवून जीवन जगण्यास प्रेरित केलं. चार्लीचा व्यक्तिगत संसार जरी सुकला तरी त्याचा कलेचा अलौकिक संसार मात्र फुलला होता, चार्ली यशाच्या सतत पायऱ्या चढत गेला म्हणून वैयक्तिक संसाराकडे संपूर्ण दुर्लक्ष झालं, पण उतरत्या वयात अखेर चॅप्लिनयांच्या चौथ्या पत्नी ऊना(वय 18) यांनी त्यांच्या संसाराची घडी नीट बसवली. पण कलेचे क्षेत्र हे अपूर्ण असतं. कितीही केलं तरी ते एक कलाकाराला कमीच वाटतं. त्यांना वृद्ध काळातही दोन विषयावरचे चित्रपट आवर्जून काढायचे होते (विषय: नेपोलियन आणि येशू ख्रिस्त), पण काळ पुढे चालत होता आणि त्यांची तब्येत साथ देत नव्हती. पण या माणसांनी एवढं ओझं असूनही मनमुराद हसाव कसं हे शिकवले.


समीक्षक : कुमार विश्वजीत

https://www.insidemarathibooks.in/index.php/2020/01/04/review-shyamchi-aai-marathi-book/

# पुस्तक परीक्षण

## संभाजी

### लेखक: विश्वास पाटील




राजन तुम हो सांजे खूब लढे हो जंग । तव तूप तेज निहारके तख्त त्यजत औरंग ।।
कवीकलशांच्या या ओळींप्रमाणे ज्या मराठा राजाने गाझी औरंगझेबाला आपला किमांश उतरवायला लावला, आपला तख्त सोडायला भाग पाडला त्या महानायकाची शौर्यगाथा म्हणजे संभाजी! पुरंदरी शिवपोटी जन्म घेऊन अवघ्या काही काळातच मातृसुखाला पारखा झालेला शिवछावा, जन्मापासून संकटांवर मात करत आयुष्यातल्या सगळ्या लढाया जिंकणारा स्वराज्याच्या गादीचा दुसरा छत्रपती, थोरल्या महाराजांनंतर अंगावर आलेला गनीम व अंतर्गत माजलेल्या स्वार्थाच्या स्तोमाने पोखरलेल्या स्वराज्याला आपल्या असिमीत पराक्रमाने अन मुत्सद्दीपणाने सावरणारा राजा, मृत्यूलाही जिंकून घेतलेला महामृत्युंजयी धर्मवीर शंभुबाळाची गाथा म्हणजे, संभाजी !

**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY**
**CALL NUMBER OF THIS BOOK**
**M 891.463 /PAT**

युवराज ते छत्रपती हा संभाजी राजांचा प्रवासच मुळात खडतर. प्रचंड आव्हाने, दुफळी यांचा सतत सामना करत हिंदवी स्वराज्याचा गाडा हाकण्यात ते यशस्वी झाले ते महाराजांनी व जिजाऊंनी पाजलेल्या बाळकडूच्या जोरावर! कोवळ्या वयात दिल्लीला जाऊन मयूर सिंहासनात बसलेल्या बादशहाला नजर भिडवणारा शंभुबाळ त्याच तडफेने मृत्यूच्या दारात देखील तसेच डोळे त्यावर वटारतो. जगाच्या पाठीवर कोणालाही लाभला नाही असा मृत्यू शंभुराजांना लाभला. तप्त सळयांनी डोळे काढले गेले, जिव्हा कापली गेली, बटाट्याच्या साली प्रमाणे कातडी सोलली गेली तरी तो नमला नाही. “असा एकही पुत्र आपल्या वाट्याला का आला नाही” हा प्रश्न खुद्द औरंगजेबाला अल्लाकडे करायला लावणारा युवराज स्वराज्याला लाभला हे या मातीचं भाग्यच! एकाच वेळी पाच पाच शत्रू अंगावर घेणारा, जंजियाला भगदाड पाडत सिद्दीला जेरीस आणणारा व प्रसंगी पोर्तुगीजांना आपल्या दहशहतीने राजधानीचे ठाणे हलवायला भाग पाडणारा संभाजी, त्यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहणाऱ्या कुलमुखत्यार धर्मपत्नी येसूबाई, कट-कारस्थानांमधून त्यांना वाचवणारे निष्ठावंत हंबीरराव मोहिते, कवीकलश आदी मंडळींची शौर्यगाथा लिहताना विश्वास पाटलांनी जी शब्दरूपी रंगाची उधळण संभाजी कादंबरीतून केली ती उल्लेखनीय आहे.

राजा संभाजी रंगेल होता की शत्रूच्या उरात धडकी भरवणारा होता, कवी मनाचा होता की मंत्र्यांना हत्तीच्या पायी देणारा निष्ठुर राजा होता, औरंगजेबाला एक इंचही जिंकून न देणारा मुत्सद्दी होता की बुऱ्हाणपूर लुटून मुघली सल्तनत हादरवणारा चलाख शासक होता, अशा एक ना अनेक अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी संभाजी हा ग्रंथ एकदा वाचायला हवा.

विश्वास पाटलांनी राजांचा मृत्यू रेखाटताना केलेलं वर्णन वाचताना डोळ्यात पाणी तरळल्याशिवाय राहत नाही. जो मृत्यू वाचताना आपणास गहिवरून येतं तो मृत्यू शंभूराजांनी कसा भोगला असावा या विचारांनी मन सुन्न होतं. संभाजी या व्यक्तिमत्वाला न्याय देताना इतिहास कमी पडतो व तोच विश्वास पाटलांनी आपल्या शैलीत उत्तमरीत्या मांडल्यामुळे संभाजी ही कादंबरी साहित्यक्षेत्रात व वाचकांच्या मनात उजवी ठरते.


समीक्षक : गिरीश खराबे

https://www.insidemarathibooks.in/index.php/2020/01/04/review-shyamchi-aai-marathi-book/

# पुस्तक परीक्षण

## स्टिव्ह जॉब्स: अधिकृत चरित्र

### लेखक: वॉलटर आयझॅक्सन
### अनुवाद: विलास साळुंके




**स्टी**व्ह जॉब्झ हा एकविसाव्या शतकातील तंत्रज्ञान क्षेत्रातील जादुगार. स्टीव्ह जॉब्झने जगाला मॅकिन्टॉश कॉम्प्युटर, आयपॉड, आयफोन, आयपॅड इत्यादी अचंबित करणारी उपकरण दिली. करिअरच्या सुरुवातीला मिळालेलं अद्भु त यश आणि तिशीत स्वतःच्या कंपनीतुन झालेली हकालपट्टी आणि परत एकदा अद्भु त यश असे टोकाचे दिवस त्याने पाहिले. कॅन्सर सारखा दुर्दैवी आजाराने देखील न डगमगता या पट्ठ्याने नवनवीन उपकरणं सादर करण्याचा सपाटाच लावला आणि एकविसाव्या शतकातील पाहिलं दशक त्याने स्वतःच्या नावे केलं.

**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY
CALL NUMBER OF THIS BOOK
M 920.90055 JOB/ISA**

या चरित्रात तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक संदर्भ आहेत, त्याचा अनुवाद देखील विलास साळुंके यांनी उत्तमरित्या हाताळला आहे. पुस्तकात असलेले स्टीव्ह जॉब्झची छायाचित्रेही अप्रतिम आहेत. या चरित्रात स्टीव्ह जॉब्झ ने त्याच्या मित्रासोबत अँपल कंपनी कशी सुरु केली याची प्रेरणादायी कथा तर आहेच पण त्याबरोबर स्टीव्हच्या स्वभावाचे विविध पैलू लेखकाने जसेच्या तसे मांडले आहेत. स्टीव्ह जॉब्झचा बंडखोर स्वभाव नकळतच अँपलच्या जनुकात कसा आला हे देखील आपल्याला समजतं. आपल्याकडे उपकरणांच्या डिझाईन बाबत जास्त उत्सुकता दिसून येत नाही पण स्टीव्हच डिझाईन बद्दल असलेलं प्रेम बघून नाक्कीच चकित व्हायला होते. त्याच्या डिझाईनच्या या वेडामुळेच अँपलचे सर्व उपकरणं आणि सॉफ्टवेअर अति शय विचारपूर्वक बनवली जातात.

स्टीव्हची अशी ईच्छा होती की त्याला एक चिरंतन काळ टिकणारी कंपनी उभी करायची होती जिथे लोक तंत्रज्ञाच्या नवनवीन सीमा गाठतील आणि त्यात तो यशस्वी झाला असं म्हणायला काहीच हरकत नाही. स्टीव्ह जॉब्झच निधन 2011 साली झालं, त्यानंतरही अँपल आपलं स्वतःच वेगळेपण जपून आहे आणि आजही तंत्रज्ञानक्षेत्रात क्रांती घडवून आणत आहे. आज आपण वापरत असलेले कॉम्प्युटर खरतर स्टीव्हच्या प्रयत्नांतून आलेले आहेत. सर्वसामान्यांसाठी बनवलेला पहिला कॉम्पुटर मॅकिन्टॉश त्याने 1984 मध्ये बाजारात आणला. मॅकिन्टॉश घडवण्याची त्याची धडपड आणि टीमकडून काम करून घेण्याच्या पद्धती भन्नाट आहेत. हे पुस्तक वाचून मॅनॅजमेन्टचे धडे मिळतील, प्रेरणा मिळेल, आधुनिक व्यवसाय कसा करावा हे देखील कळेल. चरित्र जरी स्टीव्हच्या बालपणापासून पुढे पुढे सरकत असलं तरीही काही ठिकाणी लेखकाने भविष्यातील दुवे जोडले आहेत.

"भैरवी" या प्रकरणात स्टीव्हच मनोगत आहे. त्याच मनोगत म्हणजे तंत्रज्ञान आणि आध्यात्म या दोन्हीची सांगड घालून मानवी जीवन कसं सुखकर करता येईल याविषयीचे त्याचे विचार अफाट आहेत. कॉम्पुटर /सॉफ्टवेअर किंवा इलेक्ट्रॉ निक्स क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी हे चरित्र नक्कीच वाचलं पाहिजे.


समीक्षक : अआकाश जाधव

https://www.insidemarathibooks.in/index.php/2020/01/04/review-shyamchi-aai-marathi-book/

# पुस्तक परीक्षण

## मुसाफिर

### लेखक: अच्युत गोडबोले




"धगधगत्या सूर्याने प्रकाश मिळतोच पण त्याच्या तेजाने अनेकांना त्रासही होतो... प्रकाश देण्यासाठी सूर्यच व्हावं असं जरूरी नाही... असच एक व्यक्तिमत्त्व ज्याने अगदी मवाळ पणती होऊन सर्वांना प्रकाश दिला... ज्योतीने ज्योत प्रज्वलित करत प्रकाश सर्वदूर पसरवला... आणि कोणत्याही जवळच्या व्यक्तीला त्याचा त्रासही झाला नाही. ती पणती म्हणजे अच्युत गोडबोले.

**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY**
**CALL NUMBER OF THIS BOOK**
**M 928.5479 GOD**

सोलापूरच्या एका छोट्याशया गावात जन्मलेल्या या अवलियाची कहाणी म्हणजे मुसाफिर. हे पुस्तक वाचून माणूस जिद्दीने पेटला नाही तर नवलच. आयुष्यात आलेल्या सगळ्याच चांगल्या वाईट घटनांना उजाळा देत हे पुस्तक त्यांची एक जिद्दी, लढाऊ आणि शिकाऊ मनोवृत्तीची पोचपावती देते. लहानशा गावात वाढताना झालेले संस्कार, शिक्षणाचे विलक्षण वेड, स्वतःच्या अस्ति त्वाची धडपड तसेच समाजाशी जोडली गेलेली एक नाळ... त्यातून प्रत्येक कलेविषयी, भाषेविषयी, संगीता विषयीचा आदर व भान त्यांना सगळ्यांपा सून वेगळं बनवत. श्रीमंत बनवत व एक अवलिया कलाकाराची मोहर त्यांच्यावर आपोआपच उमटते. पुस्तकांप्रति प्रेम तसेच जीवनावर आणि मानवतेवर प्रेम त्यांची कहाणी अजुनच सुरेख बनवते. या पुस्तकात जगण्याकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन पाहायला मिळेल, पुलंनी म्हतल्याप्रमाने “प्रेमात पाप नाही” याची अनुभूती येईल. आणि सर्व क्षेत्रातील त्यांचे योगदान, त्यांचे काम समजून घेताना भरून पावेल. त्यांची ती अक्षय विविधता (infinite variety) नक्कीच प्रसन्न करेल. आव्हांनाचे सुगंधी अत्तर लावून जगलेल्या माणसाने काही क्षण आपल्याला या पुसतकाद्वारे दिले आणि तेही मराठी भाषेतून, हे आपल्या मराठी जनतेचे भाग्यच म्हणायला हवे.

अच्युत गोडबोले यांबद्दल बोलावे तितके कमीच... आणि यातच त्यांनी ऑटीझम असलेल्या अनेक मुलांसाठी केले काम आपण विसरू शकत नाही. त्यांनी त्यांचा संपूर्ण जीवनपट या पुस्तकात मांडला आहे, आणि तो त्याहूनही कितीतरी मोठा आहे. “तो जगदात्मा दशांगुळे उरला” त्याचप्रमाणे त्यांचं आयुष्य आपल्याला आजूनही नीट समजलेलं नाही असं सतत वाटतं राहतं. त्यांच्या या कामाबद्दल आपण फक्त त्यांचे आभार मानू शकतो आणि असेच अधिकाधिक अनुभव त्यांकडून मिळावेत अशी आशा बाळगू शकतो. त्यांचे हे पुस्तक मनात नक्कीच घर करून राहील.

समीक्षक : अक्षय सतीश गुधाटे


https://www.insidemarathibooks.in/index.php/2020/01/04/review-shyamchi-aai-marathi-book/

# पुस्तक परीक्षण

## गणिती

### लेखक: अच्युत गोडबोले

### अनुवाद: माधवी ठाकूरदेसाई




"**ग**णिताची भीती घालवून गणिताची आवड निर्माण करणारा, गणिताचा रंजक प्रवास अच्युत गोडबोले यांनी या पुस्तकातून मांडला आहे.

**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY**
**CALL NUMBER OF THIS BOOK**
**M 891.463 051 GOD/ THA**


गणित या विषयाची भीती घालवून त्याची गोडी वाढवणारं, गणिताची मूलतत्त्वं आणि इतिहास अत्यंत सोप्या आणि सुटसुटीत भाषेत समजावून सांगणारं हे पुस्तक आहे. हजारो वर्षांपूर्वी बॅबिलोनियन, इजिप्शियन, माया, इंका, भारतीय, अरब, चिनी अशा संस्कृतीत गणिताचा उगम कसा झाला हे वाचायला मिळेल. त्याचबरोबर इथेच आर्यभट, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य, पायथंगोरस, युक्लिड, आर्किमिडीज, न्यूटन, गाऊस, रीमान, रामानुजन यांच्यासारखे अनेक महान गणितज्ञही भेटतील. या सगळ्यांच्या भावविश्वाबद्दल, त्यांच्या संघर्षाबद्दल, त्यांच्यातल्या वादविवादांबद्दल, चढाओढीबद्दल, आशा- निराशेबद्दल हे पुस्तक एक अनोखं विश्व उभं करेल. एवढंच नाही तर अंकगणित, भूमिती, बीजगणित, कॅल्क्युलस, ग्राफ थिअरी, वर्क स्पेस, गेमथिअरी, टोपॉलॉजी, चौथी मिती, नॉन-युक्लिडियन जॉमेट्री, सेट थिअरी, ग्रुप थिअरी, मॅट्रिक्स, तर्कशास्त्र, संभाव्यताशास्त्र, संख्याशास्त्र, शून्य आणि अनंत अशा अनेक कल्पना सोप्या भाषेत हे पुस्तक समजावूनही सांगतं.

समीक्षा: मनोविकास प्रकाशन

# पुस्तक परीक्षण

## बखर शिक्षणाची

### लेखक: हेरंब कुलकर्णी




**"ए**खाद्या धबधब्याला भेट देणे आणि प्रयोगशील पुस्तक वाचणे हे सारखेच असते. धबधब्याखाली उभे राहिल्यावर तुम्ही कितीही प्रयत्न केला, तरी कोरडे राहू शकत नाही. तसेच बखर शिक्षणाची या पुस्तकात परिचय करून दिलेली पुस्तकं वाचल्यावर तुम्ही कितीही पूर्वीसारखेच राहण्याचा प्रयत्न केला, तरी स्वतःचा बचाव करू शकत नाही. तुम्ही नकळत बदलत जाता. तो बदल अमूर्त असतो. तुम्ही माणूस म्हणून संवेदनशील, प्रेमळ आणि प्रयोगशील बनत जाता. म्हणून हे पुस्तक वाचायलाच हवीत.


**MITHIBAI COLLEGE JITENDRA LIBRARY**
**CALL NUMBER OF THIS BOOK**
**M 370/ KUL**


शिक्षण कशाला म्हणायचे, हेच माहीत नसल्याने पालक चुकीच्या कल्पनांचा आग्रह धरतात, मुलांवर चुकीचे संस्कार करतात. तेव्हा खरे शिक्षण म्हणजे नेमके काय, हे समजून घ्यायचे असेल तर बखर शिक्षणाची हे पुस्तक नक्कीच वाचायला हवे. पुस्तकाचे लेखन सहज आणि सोपे करताना लेखकाने काही गोष्टींचा त्यात समावेश केला आहे. जसे की, एक लहान मूल. आई त्याला नदीत आंघोळ घालताना ते तिच्या हातातून निसटले. मूल पाण्याच्या तळाशी गेले आणि पुन्हा वर आले. तळाशी गेले असताना त्याला एक रत्न दिसले. त्या रत्नाने त्याचे डोळे लकाकले. त्यानंतर जेव्हा केव्हा ते मूल एकटे असायचे, तेव्हा ते रत्न त्याच्या नजरेपुढे यायचे आणि मूल अस्वस्थ व्हायचे. मूल मोठे होत होते, पण ते रत्न काही त्याला स्वस्थ बसू देत नव्हते. एक दिवस रात्री ते घर सोडून निघाले रात्रीच्या अंधारात ते एका कोरड्या विहिरीत पडले. त्या विहिरीत एक गुहा होती. मूल गुहेत शिरले, तर एक साधू तिथे बसलेला. साधूच्या हातातं तेच रत्न होते, ज्या रत्नाने त्या मुलाला आतापर्यंत अस्वस्थ केलेले होते. साधू मुलाला म्हणाला, "ये, बाळ, ये. मी तुझीच वाट बघत होतो. ज्या क्षणी लहानपणी तुझे डोळे या रत्नाने लकाकले, त्याच क्षणी तुझा माझ्याकडे येण्याचा प्रवास सुरु झाला होता."


एखादे शिक्षणविषयक पुस्तक वाचणे म्हणजे या रुपककथेतला तो डोळे लकाकण्याचा क्षण असतो. त्यानंतर खरा शिक्षक बनण्याकडे, खरा पालक बनण्याकडे प्रवास सुरु होतो. हा डोळे लकाकण्याचा क्षण हे पुस्तक भेटवेल आणि रत्नशोधाच्या त्या प्रवासाची सुरुवात करील, अशी आशा वाटते. पुस्तकांचा परिचय देणारे हे पुस्तक शिक्षणविषय विचारांमध्ये आमूलाग्र बदल घडवणारे आहे.


समीक्षा: राजहंस प्रकाशन


# NEW ARRIVALS

































# NEW ARRIVALS
































# NEW ARRIVALS
































# NEW ARRIVALS

































# NEW ARRIVALS




























# NEW ARRIVALS





























# NEW ARRIVALS

































# NEW ARRIVALS






























**पुस्तक प्रेमी मनुष्य अत्यंत श्रीमंत आणि सुखी असतो.**

**पुस्तके ही काळाच्या विशाल सागरातून आपणास घेऊन जाणारी जहाजे होत .**

FOLLOW

facebook
Join us on Facebook

YouTube

Follow us

archana.garate@mithibai.ac.in